दै. लोकमत दि. 10-10-24

# राज्यस्तरीय जलतरण स्पर्धेत जयप्रकाशला पाच पदके

## पोलिस अंमलदाराची चमकदार कामगिरी



पोलिस अंमलदार जयप्रकाश क्षीरसागर यांचा सत्कार करताना पोलिस अधीक्षक अबिनाशकुमार.

लोकमत न्यूज नेटवर्क

**नांदेड :** महाराष्ट्र स्टेट वेटरन्स ॲक्वेटिक असोसिएशन यांच्या वतीने घेण्यात आलेल्या राज्यस्तरीय जलतरण स्पर्धेत नांदेड पोलिस दलात कार्यरत जयप्रकाश मोतीराम क्षीरसागर यांनी एकूण पाच पदकांची कमाई केली. यामध्ये तीन सुवर्ण व दोन रजत पदकांचा समावेश आहे. जलतरण स्पर्धेच्या विविध प्रकारांत त्यांनी ही चमकदार कामगिरी केली.

सप्टेंबर महिन्यात नागपूर येथे ही स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेत पोलिस अंमलदार जयप्रकाश क्षीरसागर यांनी सहभाग घेत दर्जेदार कामगिरी केली. त्यांनी ५० मीटर बटरफ्लाय, ४ बाय ५० मीटर मिडले रिले व ४ बाय ५० मीटर फ्री स्टाइल रिले प्रकारात तीन सुवर्ण, तर १०० मीटर बटरफ्लाय व ५० मीटर फ्री स्टाइल या प्रकारात दोन रजत पदक पटकावले. या यशाबद्दल पोलिस अधीक्षक अबिनाशकुमार, पोलिस उपअधीक्षक डॉ. अश्विनी जगताप, पोलिस निरीक्षक विजय धोंडगे आदींनी जयप्रकाश यांचा सत्कार केला.